# मानसशास्त्र विभागाची व्यसनमुक्ती केंद्रास अभ्यास भेट




मनोबल व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र, देवाळेचे अध्यक्ष मनीष देसाई व स्वयंसेवक यांच्या समवेत प्रा. जगदीश सरदेसाई, डॉ.एन. डी. मांगोरे व विद्यार्थी विद्यार्थिनी

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज ,माळवाडी- कोतोली येथील मानसशास्त्र विभागामार्फत एम.ए.भाग एक व दोन मधील विद्यार्थ्यांची जाणीव चॅरिटेबल फाउंडेशन संचलित मनोबल व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र ,देवाळे,ता.करवीर,जि. कोल्हापूर येथे अभ्यास सहल शनिवार दि.१३ जानेवारी २०२६ रोजी आयोजित केली होती.या अभ्यास सहलीमध्ये विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

मा. मनीष देसाई अध्यक्ष, मनोबल व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्र ,देवाळे यांनी या केंद्राची पूर्ण माहिती दिली केंद्रामध्ये व्यसनमुक्तीसाठी उपचार घेत असलेले ४० स्वयंसेवकांची माहिती दिली,त्यांच्याबरोबर संवाद साधण्याची संधी आम्हाला उपलब्ध करून दिली.

या व्यसनमुक्ती केंद्रातील दिनचर्या कशी चालते व्यसनमुक्तीसाठी आलेले जे पेशंट आहेत. तेच हे सेंटर कसे चालवतात ,स्वतःची कामे स्वतः कशी करतात.त्यातूनच व्यसनमुक्ती कडे वाटचाल कशी करतात याची पूर्ण माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. मानसशास्त्रामध्ये समुपदेशन ही एक शाखा आहे.त्याच्या अभ्यासासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी विद्यार्थ्यांनी यावेळी आत्मसात केल्या.

या केंद्राची प्रक्रिया कशी चालते या संदर्भात विशाल देसाई सरांनी परिपूर्ण अशी माहिती दिली.

पेशंटचे स्वानंद सारख्या उपचार पद्धतीमार्फत व्यक्तिमत्वातील दोष दूर केले जातात.व्यक्तिमत्व सुधारणेतून व्यसनमुक्तीचा मार्ग काढला जातो.तसेच अनेक तज्ज्ञ मनोविश्लेषकांच्याद्वारे समुपदेशन केले जाते. अभ्यास सहलीचे संयोजन मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा.जगदीश सरदेसाई व डॉ.एन.डी. मांगोरे यांनी केले.